REVIEW OF RESEARCH

ISSN: 2249-894X
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
IMPACT FACTOR : 3.8014(UIF)
VOLUME - 6 | ISSUE - 4 | JANUARY – 2017

# मर्ढेकरांची कविता एक -आकलन

प्रा.गिरी घनश्याम आनंदगीर
श्री. रावसाहेब रामराव पाटील महाविदयालय ,
सावळज तासगाव ,जि.सांगली.


B. S. Mardhekar

मर्ढेकरांचा जन्म सातारा जिल्ह्यातील मर्ढे या गावी एक डिसेंबर १९०९ मध्ये झाला मर्ढेकरांनी पुढे इंग्लंडला शिक्षण घेऊन नंतर मायदेशी आले रेल्वे खात्यामध्ये त्यांनी नोकरी केली ही नोकरी करीत असताना त्यांचा मानवी जीवनाकडे बघण्याचा दृष्टीकोन हा संवेदनशील होता तत्कालीन काळामध्ये दुसरे महायुद्ध चालू झाले होते त्याचे दूरगामी परिणाम झालेले त्यांना पाहावयास मिळाले या महायुद्धाच्या पूर्वी मर्ढेकरांची कविता थोडी वेगळी होती त्यांचे मन बाल करून सारखे निसर्गाकडे वळू घेणारे होते म्हणून त्या काळातील काव्यनिर्मिती वेगळे आहे तर काळातील कविता वेगळे आहे हा फरक येथे आपणास लक्षात घ्यावा लागतो त्यांनीमर्ढेकरांच्याकविता, रात्रीचा दिवस ,तांबडी माती ,सौंदर्य आणि साहित्य ,व कला आणि मानव अशी पुस्तके त्यांनी लिहिली आहेत.

मर्ढेकरांनी शिशिरागम काही कविता आणखी काही कविता अशा तीन कविता तीन भागांमध्ये कविता लिहिली आहे प्रत्येक कालखंडानुसार परिस्थितीनुसार काव्य रचनेतील शैली बदललेल्या आढळते त्यांची कविता ही निसर्गात रमताना आढळते

शिशिर ऋतूच्यापुनरागमे
एकेक पान गळावया
का लागतामजयेतसे
नकळेउगाचंरडावया
पानांत जीं निजलीं इथे
इवली सुकोमल ,पाखर
जातील सांग आता कुठे

निष्पर्ण झाडित कांपरे

शिशिर ऋतूच्या आगमनाने झाडावरील पानगळ सुरु झाल्यानंतर त्या झाडांच्या पानांच्या सावलीत बसणाऱ्या पाखरांनी कुठे जायचे असा प्रश्न ते स्वगतच विचारीत आहेत. तर एकीकडे तारुण्य सुलभ प्रेम व्यक्त होत असतानाच विपरीत घटना घडत आहेत.

प्रेमाचे लव्हाळे,
सौंदर्य नव्हाळे
शोधू?
आसपास
मुडद्यांची रास
, यंत्रातून आग;
गोळ्यांचे पराग
विमानाचे हल्ले,
बेचिराख जिल्हे;
रक्ताची थारोळी;
अपंग आरोळी आरोळी ‘२

ही कविता दुसऱ्या महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर यांनी केले आहे एकीकडे प्रेमासक्त भोवती सौंदर्य शोधणारे मन आहे तर दुसरीकडे महायुद्धामुळे सुंदर दिसणारी पृथ्वी7 बेचिराख होत असल्याची खंत कवीने व्यक्त केली आहे.

याच पार्श्वभूमीवर विनाकारण मरणाऱ्या सैनिकांबद्दल त्यांच्या मनामध्ये चिंता वाटते जगावर राज्य करण्याची इच्छा धरणाऱ्या हिटलर ला उद्देशूनयावेळी त्यांनी लिहिल्या असाव्यात हिटलर प्रवृत्तीही प्रातिनिधिक आहेते या ओळीत लिहितात,

मोले धाडी जो मराया|
नाही आसू आणि माया
त्यासी नेता बनवावे|
आम्हा मेंढरास ठावे. ,३

अशी स्वार्थी प्रवृत्ती जगामध्ये सगळीकडेच असल्याचे ते सांगतात भारतासारख्या देशांमध्ये पराकोटीची धर्मांधता,पूजाअर्चा चाललेली आढळते हे पाहून मर्ढेकरांचे मन अस्वस्थ होते एकीकडे आधुनिक यंत्रयुग आलेले असताना त्याचा आपण स्वीकार करायला पाहिजे असे त्यांना वाटते ते म्हणतात,

‘काष्ठझालेल्याहोमनी|जळी स्थळी नि पाषाणी
सांगा पाहिला का कधी |देव कुणी ||
सांगू कोणा तत्वज्ञान. |पान पान जाळी झाले,
गेल्या वर्षीच पोथीत |किडे व्याले ||४

मर्ढेकरांचा नास्तिक असा दृष्टिकोन दिसून येतो.ते यंत्रयुग व विज्ञान योगाचा स्वीकार करीत आहेत पण याच बरोबर मानवता व नीतिमत्ता यामध्ये कुठेही बाधा येऊ नये असे त्यांना वाटते मर्ढेकरांनी मराठी कवितेमध्ये नव्हता आणली पारंपारिक कविता त्यांनी आधुनिक कवितेचे जनक म्हणतात यांच्या कवितेविषयी डॉ.मदन कुलकर्णी लिहितात, मर्ढेकरांची कविता समकालीन वास्तवातून प्रगट झालेली आहे त्यांच्या संवेदनशीलतेला भावलेले सभोवतीचेसभोवतीचे वास्तव हेआधुनिकवादीजाणिवेचे अपत्य होते.या वास्तवाने आशयाला आकार दिला.”५

डॉ.**मदनकुलकर्णी यांनी मर्ढेकरांच्या कवितेबद्दल जे उद्गार काढले आहेत तेच यथार्थ आहेत मर्ढेकरांच्या कवितेने मराठी पारंपारिक काव्यरचना मोडीत काढले असेच म्हणावे लागेल निष्कर्ष खांडेकरांची कविता निसर्ग व मानव यांचा स्वीकार करणारी आहे मानवता व मानवी मूल्ये यांचा आदर करणारी व स्वार्थ वा परमार्थ येणार नाकारणारी आहे विज्ञान युग,यंत्रयुगहे मानवाचा विकास घडविणारे आहे. असे मर्ढेकरांना वाटते. म्हणून त्याचा स्वीकार करणारी अशी रचना आहे.मर्ढेकरांची कविता काहीशी दुर्बोध आहे असे अनेक अभ्यासकांचे मत आहे.**

## संदर्भ ग्रंथ सूची


**१) मर्ढेकरांची कविता:- संपा. श्री.पु. भागवत,मौज प्रकाशन मुंबई,प्रथमावृत्ती१९५९,पृष्ठ क्रमांक २०**
**२) उ.नि.पृष्ठ क्र.२४**
**३) उ.नि.पृष्ठ क्र.२५**
**४) उ.नि.पृष्ठ क्र.२६**
**५) आकंठ:-संपा.रंगनाथचोरमुले, दिवाळीअंक२००४**
**६) लेखडॉ. मदन कुलकर्णी ,पृष्ठ क्र.१९४**